दैनिक

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक २५२ •गुरूवार,दि.११ डिसेंबर २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955

लाडक्या बहिणींसाठी एकनाथ शिंदेंची सभागृहात मोठी घोषणा

नागपूर । प्रतिनिधी

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही राज्य सरकारची एक लोकप्रिय योजना आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी महिलांना प्रत्येक महिन्याला १५०० रुपयांची आर्थिक मदत केली जाते. सध्या पात्र महिलांकडून केवायसीची प्रक्रिया करून घेतली जात आहे. या प्रक्रियेदरम्यान महिलांना अनेक अडचणी येत आहेत. दुसरीकडे नियमांचे उल्लंघन करून लाभ घेणाऱ्या अनेक लाडक्या बहिणींची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली आहे. या सर्व मुद्द्यांवर आज (१० डिसेंबर) राज्य विधिमंडळात मोठी खडाजंगी झाली. विरोधकांनी या योजनेत मोठा घोळ झाला आहे, असा गंभीर आरोप करत महिलांना २१०० रुपयांची वाढीव मदत कधी देणार असे विचारले तर सत्ताधाऱ्यांनी विरोधकांचे आरोप खोडून काढले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तर लाडक्या बहिणींसाठी सभागृहात मोठी घोषणा केली.

२१०० रुपये कधी मिळणार?

विरोधकांनी उपस्थित केलेल्या या प्रश्नांना महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी उत्तर दिले. लाडक्या बहिणींना नावनोंदणी करण्यासाठी पोर्टल उपलब्ध करून देण्यात आले होते. तसेच ऑफलाईन पद्धतीनेही नावनोंदणी करण्याची सोय उपलब्ध करून दिली होती. त्यामुळे कोणताही वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन ▶ उर्वरित पान २ वर

● विरोधकांनी काय आक्षेप घेतला ?

लाडकी बहीण योजनेत मोठा घोळ झालेला आहे. आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, ग्रामसेवक यांना कामाला लावण्यात आले. त्यांना टार्गेट देण्यात आले. अमुक–अमुक फॉर्म भरून झालेच पाहिजेत, असे त्यांना सांगण्यात आले. त्यानंतर या कर्मचाऱ्यांनी अनेक ठिकाणी बोगस फॉर्म भरले आहेत. या योजनेत मोठी गडबड झालेली आहे. या गडबडीला कोण जबाबदार आहे. या योजनेसाठी वापरण्यात आलेले पैसे हे सरकारवर बसलेल्यांचे नाहीत. सत्तेत बसलेले मालक नाहीयेत. जनतेच्या पैशांचा हिशोब द्यावा लागेल, असा थेट जाब काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी विचारला.

सरकारचा मोठा निर्णय: जमिनीच्या NA परवानगीनंतर आता 'सनद'ची अटही रद्द; रेडी रेकनरनुसार नवीन प्रीमियमचे दर जाहीर

नागपूर । प्रतिनिधी

राज्यातील जमीन महसूल प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी राज्य सरकारने आणखी एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. अकृषिक परवानगीची अट रद्द केल्यानंतर आता त्यापुढील 'सनद' घेण्याची अटही रद्द करण्यात आली असून या संदर्भातील 'महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक २०२५'

महसूलमंत्री चंद्रशेखर बानकुळे यांनी विधानसभेत मांडले.

नेमका बदल काय? महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत या विधेयकाची पार्श्वभूमी मांडताना स्पष्ट केले की, १९६६ च्या जमीन महसूल संहितेमध्ये २०१४ ते २०१८ दरम्यान सुधारणा करून रहिवासी आणि वाणिज्यिक वापरासाठी 'एन.ए.' (अकृषिक) परवानगीची अट यापूर्वीच शिथिल करण्यात आली होती. मात्र, त्यानंतरही 'सनद' घ्यावी लागत असल्याने प्रक्रियेत ▶ उर्वरित पान २ वर

लाडकी बहीण योजनेतून २० लाख लाभार्थी अपात्र; E-KYC बाबत मंत्री तटकरेंची मोठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

विधानमंडळात 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेवर उपस्थित करण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेला महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी उत्तर देत शासनाची भूमिका स्पष्ट केली. तसेच, महिला व बालविकास खात्याच्या वतीने

योजनेची पारदर्शक अंमलबजावणी आणि पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांचे लाभ नीट पोहोचावेत, यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितलं.

लाडकी बहीण योजनेसाठी एकूण २ कोटी ६३ लाख ८३ हजार ५८९ अर्ज प्राप्त झाले होते. यापैकी २ कोटी ४३ ▶ उर्वरित पान २ वर

ई–वाहनांना टोलमाफीची आठ दिवसात अंमलबजावणी करा: विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर

नागपूर । प्रतिनिधी

राज्यातील ईव्ही व ई–बाइक वापरकर्त्यांना टोलमाफी देण्याबाबत पुढील आठ दिवसांत कार्यवाही करावी, असे स्पष्ट निर्देश देत या निर्णयाच्या अंमलबजावणी पासून आज पर्यंतच्या काळात टोल घेतला गेला असल्यास पुरावा सादर केल्यावर नागरिकांना टोल परतावा द्यावा, असे आदेश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिले. ई वाहनांना टोल माफी देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. या संदर्भात काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब सदस्य अनिल पाटील यांनी विधानसभेत मांडली. त्यावर अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी हे निर्देश दिले. अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी राज्यातील अपुऱ्या चार्जिंग स्टेशन्सचा मुद्दाही उपस्थित करत, ई–वाहनांसाठी किमान १२० के. डब्लू. (kw) क्षमतेची फास्ट चार्जिंग स्टेशन्स उभारण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. सध्या उपलब्ध चार्जिंग स्टेशन्सवर वाहन ▶ उर्वरित पान २ वर

ज्याची भीती होती शेवटी तेच घडलं, ट्रम्प यांचा भारताला सर्वात मोठा धक्का, अमेरिकेनं अचानक घेतलेल्या निर्णयामुळे देशात खळबळ

वृत्तसंस्था

भारत रशियाकडून तेलाची खरेदी करतो म्हणून अमेरिकेनं भारतावर ५० टक्के टॅरिफ लावला आहे, भारतानं रशियाकडून तेलाची खरेदी करू नये अशी अमेरिकेची भूमिका आहे. चीन आणि भारत रशियाकडून तेलाची खरेदी करतात, तो पैसा रशिया युक्रेनविरोधात युद्धासाठी फंड म्हणून वापर करत असल्याचा आरोप वारंवार अमेरिकेकडून करण्यात येत आहे, दरम्यान अमेरिकेनं लावलेल्या टॅरिफनंतर पहिल्यांदाच रशियाचे राष्ट्रपती व्लादीमीर पुतिन भारताच्या दौऱ्यावर आले होते. व्लादीमीर पुतिन यांच्या या दौऱ्याकडे अमेरिकेसह जगाचं लक्ष लागलं होतं. पुतिन यांचा हा दौरा अनेक अर्थानं महत्त्वाचा होता. या दौऱ्यादरम्यान भारतानं अमेरिकेचा टॅरिफ दबाव झुगारून रशियासोबत अनेक महत्त्वाचे करार केले आहेत. रशिया आणि भारताची वाढत असलेली जवळीक ही अमेरिकेसाठी आता डोकेदुखीचा विषय ठरली आहे. तर दुसरीकडे भारत दौऱ्यावर असताना पुतिन यांनी देखील मोठं वक्तव्य केलं आहे. भारताला आपण कधीही कच्च्या तेलाचा पुरवठा कमी पडू देणार नाही ▶ उर्वरित पान २ वर

पिंपळवाडी सबस्टेशन ५ MVA क्षमतेचा ट्रांसफार्मरला मान्यता : राजेंद्र मस्के

शेतकऱ्यांच्या मागणीनुसार पिंपळवाडी सबस्टेशन अंतर्गत गावांना अंतर्गत गावांना दिवसा कृषी पंपा साठी लाईट मिळणार!

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील पिंपळवाडी स्टेशन करिता ५ MVA क्षमतेचा नवीन ट्रांसफार्मरला मान्यता मिळाली असून लवकरच हे काम पूर्ण केले जाईल. या ट्रांसफार्मर मुळे पिंपळवाडी सबस्टेशनची क्षमता दुप्पटीने वाढणार असल्याची माहिती ▶ उर्वरित पान २ वर

बिडकरांकडून शिरूरच्या महंताचा हृद्य सत्कार !

फुलांच्या पायघड्या, रांगोळीची सजावट आणि तोफांची सलामी !

शिरूर का. । प्रतिनिधी

येथील महंत स्वामी विवेकानंद शास्त्री हे सिध्देश्वर संस्थान बरोबर आता मुंबई कांदिवली येथील आनंदाश्रम मठाचा पदभार सांभाळणार असल्याने त्यांचा बिडकरां कडून मंगळवारी ठिकठिकाणी हृद्य सत्कार संपन्न झाला . सोळा

वर्षापुर्वी वै.आबादेव महाराज यांचे गादिवर संस्थानचे महंत म्हणून कोकण रत्न स्वामी विवेकानंद शास्त्री यांची निवड करण्यात आली होती ,महंतपदी वै.विठ्ठल महाराज घुले आळंदी देवाची व श्रीक्षेत्र भगवानगडाचे महंत न्यायाचार्य डॉ नामदेव महाराज शास्त्री यांचे प्रमुख उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला होता . सिध्देश्वर संस्थानचा भौतिक विकास ▶ उर्वरित पान २ वर

'ईव्हीएम स्ट्राँगरुमला' एसआरपीएफचा पहारा, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात नगर परिषदेच्या झालेल्या निवडणुकीनंतर 'ईव्हीएम स्ट्राँगरुमला' एसआरपीएफचा पहारा देण्यात आला असून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची करडी नजर ठेवली आहे.

जिल्ह्यातील नगर परिषदेच्या नगरसेवक आणि नगराध्यक्षपदासाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले असुन उमेदवारांचे भवितव्य मतदानयंत्रात बंद झाले आहेत. या निवडणूकीचा



निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर केला जाणार आहे. तोपर्यंत मतदानयंत्र निवडणूक विभागाने निर्माण केलेल्या स्ट्राँगरुममध्ये ठेवण्यात आले आहेत. दरम्यान सदरील मतदानयंत्रांच्या सुरक्षेसाठी राज्य राखीव दलाच्या जवानांचा चोविसतास पहारा ठेवण्यात आला असून स्ट्रॉगरुम परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. राजकीय दृष्ट्या महत्वपुर्ण असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

बीडमध्ये तहसीलदारांची बनावट सही करुन क्षेत्र दुरुस्तीचे काढले आदेश



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट सहीने २४१ कोटींचा मावेजा घोटाळा अजून संपलेला नसतानाच महसूल विभागात आता नवा घोटाळा समोर आला आहे. केजच्या तहसीलदारांच्या बनावट स्वाक्षऱ्या करुन सातबाऱ्यावरील क्षेत्र दुरुस्तीचे तब्बल ५ आदेश मागील वर्षभरात काढण्यात आले असल्याची माहिती मिळाली आहे यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार केजमध्ये थेट तहसीलदारांच्या बनावट सह्यांचा प्रकार समोर आला आहे. जमीनीच्या सातबारावरील क्षेत्र दुरुस्तीचे अधिकार हे तहसीलदारांना असतात. मात्र तहसिलदारांच्या नावाने बनावट स्वाक्षऱ्यांद्वारे वाघ यांनी दहिफळ बडमाऊली, लाडेगाव, नांदूरघाट आणि वाघे बाभुळगाव या गावातील जमीनीच्या बाबतीत हे आदेश काढण्यात आले आहेत. दरम्यान, हा प्रकार समोर आल्यानंतर तहसिलदार राकेश गिड्डे यांनी प्राथमिक चौकशी करून अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांना दिला आहे. यामध्ये सह्या बनावट असल्याचे स्पष्ट केले आहे. उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी हा अहवाल ▶ उर्वरित पान २ वर

बीड शहरातील जम जम कॉलनीमध्ये मोकाट कुत्र्यांचा वाढता त्रास

नागरिकांत भीतीचे वातावरण, न.प.कडून तातडीने बंदोबस्ताची मागणी : इमाद इनामदार

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील जम जम कॉलनीसह विविध भागांत मोकाट कुत्र्यांचा उच्छाद मोठ्या प्रमाणात वाढला असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा मुद्दा गंभीर बनला आहे. शाळेत जाणारी लहान मुले, सकाळी व्यायामासाठी जाणारे नागरिक, महिलावर्ग तसेच रात्री प्रवास करणाऱ्या नागरिकांना कुत्र्यांच्या टोळक्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

अनेकांनी भीतीमुळे रात्री बाहेर पडणेही टाळल्याचे सांगितले. शहरातील अनेक भागांत–मुख्य बाजारपेठ, वसाहती, शाळांच्या परिसरात–कुत्र्यांचे टोळके मुक्तपणे फिरत असल्यामुळे नागरिकांच्या मनात दहशत पसरली आहे. विशेष म्हणजे काही ठिकाणी मुलांवर आणि ज्येष्ठ नागरिकांवर हल्ल्याच्या घटना घडल्याची माहिती समोर आली असून त्यामुळे नागरिकांत चिंतेचे वातावरण अधिकच गडद झाले आहे. या पार्श्वभूमीवर जम जम कॉलनीतील स्थानिक नागरिक सोमेश कदम यांनी ▶ उर्वरित पान २ वर

बीड शहरामध्ये १८.६८ कोटींची थकबाकी; ५८ जणांचा वीजपुरवठा खंडित

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील घरगुती, वाणिज्य, औद्योगिक तसेच शासकीय–निमशासकीय असे एकूण ५३ हजार ४१ महावितरण ग्राहकांची मोठ्या प्रमाणावर वीज बिल थकबाकी वाढली आहे. शहरातील एकूण थकबाकी १८.६८ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. ही थकबाकी न भरणाऱ्या ५८ जणांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे. नोव्हेंबर महिन्यात महावितरणची १९.०२ कोटी रुपयांची मागणी होती. तर १६.०४ कोटी वसुली झाली असून २.९८ ▶ उर्वरित पान २ वर

दैनिक मराठवाडा पत्र

संपादकिय

● गुरूवार, दि.११ डिसेंबर २०२५

● पान १

बाबा आढाव हे महात्मा फुलेंच्या विचारांची जिवंत साक्ष होते!

डॉ. बाबा आढाव हे केवळ एक सामाजिक कार्यकर्ते नव्हते, तर ते महात्मा फुलेंच्या विचारांची जिवंत, चालती-बोलती साक्ष होते. फुलेंनी मांडलेले सत्य, समता, शिक्षण, स्त्रीमुक्ती आणि शोषणविरोधी संघर्ष यांचे तत्त्वज्ञान बाबांनी केवळ भाषणांत मांडले नाही, तर ते स्वतःच्या आयुष्यात उतरवून दाखवले. म्हणूनच बाबा आढाव म्हणजे फुल्यांचे विचार कागदावर नव्हे, तर रस्त्यावर, झोपडीत, हमालवस्तीत आणि श्रमिकांच्या घामात जिवंत झाल्याची साक्ष होते.

महात्मा फुलेंनी शोषित, दलित, स्त्रिया आणि कष्टकरी यांच्या उद्धारासाठी सत्यशोधक चळवळीची मुहूर्तमेढ रोवली. बाबांनी त्याच वाटेवरून चालत आधुनिक काळात सत्यशोधकतेचा वारसा पुढे नेला. बाबांची घडण राष्ट्र सेवा दलात झाली. साने गुरुजींचा सेवाभाव, फुल्यांची प्रश्नांची धार, शाहू महाराजांची समतेची भूमिका आणि डॉ. आंबेडकरांचे संविधानिक भान-या साऱ्यांचा संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला. म्हणूनच बाबांची चळवळ केवळ आर्थिक न्यायापुरती मर्यादित राहिली नाही; ती सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ बनली.

फुलेंनी शिक्षणाला मुक्तीची किल्ली मानली. बाबांनी त्याच विचाराला कृतीत उतरवले. हमाल, माथाडी, कचरा वेचक, झोपडपट्टीतली मुले-ज्यांना समाजाने शिक्षणापासून दूर ठेवले, त्यांच्यासाठी बाबांनी शाळा उभारल्या, अभ्यासाची सोय केली, शिष्यवृत्ती मिळवून दिल्या. शिक्षणाने माणूस बदलतो, आणि माणूस बदलला की समाज बदलतो-हा फुल्यांचा सिद्धांत बाबांनी प्रत्यक्ष जमिनीवर उतरवून दाखवला.

फुल्यांनी जातव्यवस्थेवर घणाघाती प्रहार केला. बाबांनी जात केवळ भाषणांत नाही, तर रोजच्या व्यवहारात मोडून काढण्याचा प्रयत्न केला. 'एक गाव - एक पाणवठा' ही चळवळ म्हणजे फुल्यांच्या समताविचाराचा थेट विस्तार होता. पाणी जरी सर्वांसाठी असले, तरी गावात ते सर्वांना समान मिळत नव्हते. बाबांनी या अन्यायाविरोधात गावोगावी संघर्ष उभा केला. ही केवळ पाण्याची लढाई नव्हती, तर ती माणूस म्हणून समान अधिकार मिळवण्याची लढाई होती.

फुल्यांनी स्त्रीशिक्षण आणि स्त्रीमुक्तीचा पाया घातला. बाबांनी परित्यक्ता स्त्रिया, देवदासी, महिला हमाल, महिला कचरा वेचक यांच्या प्रश्नांना आपलंसं केलं. त्यांच्यासाठी निवारा, रोजगार, सन्मान मिळवून देण्याचा संघर्ष केला. बाबांसाठी स्त्री ही केवळ सहानुभूतीची व्यक्ती नव्हती, तर ती समाजबदलाची शक्ती होती-हा फुल्यांचा विचार बाबांनी कृतीतून जपला. फुल्यांनी शोषणाविरोधात शोषितांना जागं केलं. बाबांनी हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजूर, टेम्पो चालक, कचरा वेचक यांना संघटित करून त्यांचे शोषण थांबवण्याचा प्रयत्न केला. 'हमाल पंचायत' ही संस्थाच त्या सत्यशोधक परंपरेची आधुनिक आवृत्ती ठरली. बाबांनी या श्रमिकांना फक्त आर्थिक मदत दिली नाही, तर त्यांना माणूस म्हणून उभं केलं. संघटना, घरे, शाळा, पतपेढ्या, कष्टाची भाकर योजना-या सगळ्या उपक्रमांतून बाबांनी फुल्यांच्या बहुजन सुखाय या संकल्पनेला व्यवहार्य रूप दिले.

महात्मा फुल्यांचे विचार हे केवळ सामाजिक नव्हते, तर ते वैज्ञानिक आणि विवेकवादी होते. बाबांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, विषमतेची धार्मिक व्यवस्था यांच्याविरोधात सातत्याने आवाज उठवला. जातीच्या आधारावर माणसाची किंमत ठरवणारी कोणतीही व्यवस्था अमानवी आहे, हे फुल्यांचे तत्त्व बाबांनी आपल्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर जपले.

फुल्यांना आयुष्यात मोठा सामाजिक विरोध सहन करावा लागला. बाबांनाही अपप्रचार, उपहास, बदनामी सहन करावी लागली. बाबा आढाव - झगडा वाढाव अशी हेटाळणी झाली. मनुवादी शक्तींनी त्यांना लक्ष्य केलं. पण जसे फुले सत्यापासून ढळले नाहीत, तसे बाबा देखील कधी विचलित झाले नाहीत. कारण त्यांचा आधार व्यक्ती नव्हे, तर विचार होते. फुल्यांची चळवळ ही राजसत्तेच्या चौकटीत अडकलेली नव्हती. बाबांचाही संघर्ष सत्तेच्या मोहापासून दूर राहिला. १९६७ साली लोकसभा निवडणूक आणि १९७१ मध्ये पुणे महापालिकेचे नगरसेवकपद-इतकाच त्यांचा राजकीय प्रवास. सत्ता मिळाल्यावरही त्यांनी ती सोडली, कारण बाबांसाठी सत्ता हे ध्येय नव्हते; समाजपरिवर्तन हेच त्यांचे ध्येय होते. हीच फुल्यांच्या विचारांची खरी ओळख आहे.

म्हणूनच अत्यंत ठामपणे म्हणावे लागते-

बाबा आढाव म्हणजे फुलेंच्या विचारांचा इतिहास नव्हे, तर वर्तमानकाळात चालणारी साक्ष होती.

ती साक्ष शरीराने शांत झाली आहे, पण विचारांनी ती अजूनही महाराष्ट्रभर फिरत आहे.

डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य,
वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.

◆ पान 9 वरून पुढे...

लाडक्या बहिणींसाठी...

आदिती तटकरे यांनी केले. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नाना पटोले यांना लक्ष्य करून तुम्ही लाडकी बहीण योजनेवर बोलू नये. या योजनेला तुम्ही विरोध केला होता. तुम्ही योजनेला विरोध केला म्हणूनच विधानसभा निवडणुकीत तुमचा पराभव झाला. आता आणखी तुम्ही या योजनेला विरोधच करत असाल तर भविष्यातही लाडक्या बहिणी तुम्हाला घरी बसवतील, असा हल्लाबोल केला. यासह लाडक्या बहिर्णींना २१०० रुपयांची वाढीव मदत कधी देणार ? असे विचारल्यानंतर एकनाथ शिंदे यांनी योग्य वेळ आली की आम्ही लाडक्या बहिणींना २१०० रुपयांचा लाभही देऊ, अशी माहिती एकनाथ शिंदे यांनी सभागृहात केली.

सरकारचा मोठा...

क्लिष्टता होती. आता ही अट पूर्णपणे काढून टाकण्यात आली असून, त्याऐवजी नाममात्र प्रीमियम (अधिमूल्य) आकारला जाणार आहे.

असे असतील नवीन प्रीमियमचे दर (रेडी रेकनरनुसार) जमिनीच्या वापरासाठी आता सनदची गरज नसून, खालीलप्रमाणे रेडी रेकनरच्या (बाजारमूल्य) आधारावर प्रीमियम भरून वापर नियमित करता येईल.

१००० चौरस मीटरपर्यंत : रेडी रेकनरच्या ०.१ टक्का.१००१ ते ४००० चौरस मीटरपर्यंत: रेडी रेकनरच्या ०.२५ टक्के. ४००१ चौरस मीटर व त्यापुढील भूखंडांसाठी : रेडी रेकनरच्या ०.५ टक्के. या बदलामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळणाऱ्या करात किंवा शुल्कात कोणतीही कपात होणार नसून, त्यांना त्यांचा वाटा मिळणार असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे.

विरोधकांकडून स्वागत- या विधेयकावर चर्चा करताना विरोधकांनी या निर्णयाचे स्वागत केले. अकृषिक कराची अट रद्द करून सनदची प्रक्रिया सोपी केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. आमदार विक्रम काळे, प्रवीण दटके, योगेश सागर, रमेश बोरनारे, जयंत पाटील यांनी विधेयकाचे स्वागत तर महसूलमंत्री बावनकुळे यांचे अभिनंदन केले. काँग्रेसचे आमदार नाना पटोले यांनी यावेळी शेतजमिनी वाचवण्याचा मुद्दा उपस्थित केला. शहरीकरणामुळे कृषक जमीन कमी होत चालली आहे आणि दुसरीकडे पुरामुळे नदीकाठची जमीन खरडून जात आहे. त्यामुळे कृषक जमीन टिकवणे हे मोठे आव्हान असल्याचे मत त्यांनी मांडले.

लाडकी बहीण....

लाख ८२ हजार ९३६ अर्ज विभागाने पात्रतेनुसार ग्राह्य धरले. उर्वरित फॉर्म हे प्राथमिक पडताळणीतच अपात्र ठरले होते. माहिती तंत्रज्ञान विभागाकडून प्राप्त झालेल्या २६ लाख अर्जांच्या डेटाचे क्रॉस-व्हेरिफिकेशन करताना केवळ ४ लाख अर्जांचे पुनर्पडताळणीची आवश्यकता आढळली. उर्वरित सर्व अर्ज पात्र लाभार्थी म्हणून निश्चित करण्यात आले. योजनेसाठी आवश्यक असलेली विभागनिहाय माहिती ही संबंधित विभागांकडून मागवण्यात आली होती. कृषी विभागाकडील नमो शेतकरी योजनेचे लाभार्थी, अन्न व नागरी पुरवठा विभाग, शालेय शिक्षण विभाग तसेच माहिती तंत्रज्ञान विभागाकडील डेटाचा वापर करून लाभार्थ्यांची सखोल

◆ पान 9 वरून पुढे...

पडताळणी करण्यात आली. साधारणपणे १२ ते १४ हजार महिलांच्या नावावर पुरुषांची बँक खाती जोडलेली असल्याचे पडताळणीत दिसून आले. अनेक महिलांची वैयक्तिक खाती नसल्यामुळे त्यांनी घरातील वडील, भाऊ किंवा पती यांची खाती दिल्याचे स्पष्ट झाले. विभागाने अशा प्रकरणांचे सखोल परीक्षण करून कोणतीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही, याची खात्री केली आहे. लाभार्थींचे अचूक प्रमाणीकरण करण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या ई-केवायसी प्रक्रियेत मोठी प्रगती झाली असून, आत्तापर्यंत १ कोटी ७४ लाखांहून अधिक महिलांची ई-केवायसी पूर्ण झाली आहे. ई-केवायसीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर असून, उर्वरित लाभार्थ्यांनाही ही सुविधा उपलब्ध आहे.

ई-वाहनांना...

चार्जिंगसाठी आठ तास लागत असल्याने ही व्यवस्था तातडीने सुधारावी, असेही त्यांनी म्हटले. प्रश्नाला उत्तर देताना मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले की, महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५ अंतर्गत समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि शिवडी-न्हावाशेवा अटल सेतू या मार्गांवर ई-वाहनांना टोलमाफीचे धोरण २३ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आले असून २२ ऑगस्ट २०२५ पासून अंमलबजावणी सुरू आहे. ईव्ही फास्टटॅग रजिस्ट्रेशन, एनआयसी डेटाबेसमधील नोंदणी आणि बँक इंटिग्रेशनची प्रक्रिया सुरू असल्याचे मंत्री भुसे यांनी सांगितले.

ज्याची भीती...

असं त्यांनी म्हटलं आहे. हा अमेरिकेसाठी मोठा झटका मानण्यात येत आहे. दरम्यान पुतिन भारत दौऱ्यावर असतानाच अमेरिकेनं आपली एनएसएस, राष्ट्रीय सुरक्षा धोरण जाहीर केलं, त्यामध्ये भारत हा आपला एक महत्त्वाचा भागीदार देश असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे. मात्र त्यानंतर अवघ्या काही दिवसांमध्येच आता अमेरिकेनं भारताला मोठा झटका दिला आहे. अमेरिकेकडून H1-B व्हिसासाठी भारतीय अर्जदारांच्या अपॉइंटमेट तारखा पोस्टपॉन्ड करण्यात आल्या आहेत. भारतामधील अमेरिकेच्या दूतावासाने ट्विटरवर पोस्ट शेअर करत याबाबत माहिती दिली आहे. यामुळे आता अमेरिकेत जाऊ इच्छिणाऱ्या भारतीय नागरिकांचं मोठं नुकासन होण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या भारतातील दूतावासानं दिलेल्या माहितीनुसार या तारखा आता २०२६ पर्यंत पोस्टपॉन्ड करण्यात आल्या आहेत. अमेरिकेकडून H1-B आणि H-4 व्हिसासाठी आता नवे नियम लागू करण्यात आले आहेत.

पिंपळवाडी सबस्टेशन....

राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. तसेच सूर्याचीवाडी भाळवणी, देवऱ्याचीची वाडी आधी परिसरात दोन दिवसात होणारा विद्युत पुरवठा रद्द करून दिवसात दोन टप्प्यांत विद्युत पुरवठा केला जाणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष माननीय राजेंद्र मस्के यांनी, अधीक्षक अभियंता महाराष्ट्र विद्युत कंपनी बीड यांची भेट घेतली. सूर्याचीवाडी ग्रामस्थासह

◆ पान 9 वरून पुढे...

भेट घेऊन मागण्यांची निवेदन दिले. सूर्याचीवाडी, देवऱ्याचीवाडी भाळवणी, मांडवजाळी मंजरी, आदमानेवस्ती वायकर वस्ती या गावांना दोन दिवसाआड विद्युत पुरवठा करण्याऐवजी एक दिवसात दोन टप्पे करून खालील गावांना दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा. या मागणी केली . या मागणीला मान्यता मिळाली आहे. पिंपळवाडी स्टेशनवर क्षमतेपेक्षा जास्त विद्युत लोड वाढल्याने आवश्यक त्या प्रमाणात विद्युत पुरवठा होत नाही. शेतकऱ्यांच्या कृषी पंपांना सुरळीत वीजपुरवठा होत नाही. या भागातील विद्युत पुरवठा सुरळीत होऊन शेतकऱ्यांच्या मुबलक विद्युत पुरवठा व्हावा यासाठी पिंपळवाडी बिंदुसरा नदीवरील पुल कामाबरोबर पिंपळवाडी ३३ केव्हीसब स्टेशनची क्षमता वाढवण्यासाठी नवीन ट्रांसफार्मर करिता पाठपुरावा केला होता. ट्रांसफार्मर ला मान्यता मिळाली असून तेथे काही दिवसात हे काम पूर्ण होईल. व पिंपळवाडी सब स्टेशन वरील सर्व विद्युत ग्राहकांना उच्च दाबाने विद्युत पुरवठा होईल

बिडकरांकडून शिरूरच्या...

करत असतांना संस्थानचा धाकटी अलंकापुरी म्हणून नावलौकिक तर केलाच परंतू जात , धर्म, पंथ, लहाण ,मोठा ,महिला, पुरूष यांचे बरोबर लहाण लहाण बाळांना देखील लळा लावला ,लहान मुल मुली तर त्यांना चॉकलेट वाले बाबा म्हणूनच बोलत होते . मुस्लिम समाजाबरोबर देखील त्यानी आपली नाळ जोडली असल्याचे सिध्द केले . सिध्देश्वर संस्थानला जवळपास पंचवीस गावांना जोडले होते ,तालुकाच नव्हे तर जिल्हा आणि महाष्ट्रभर त्यांनी आपली अध्यात्मिक छाप टाकली होती . नुकतीच त्यांचेवर सिध्देश्वर संस्थान बरोबर कांदिवली येथील आनंदाश्रम आपल्या गुरूगादिची सेवा करण्याची संधी मिळाली असल्याने त्यांचेकडे दुहेरी जबाबदारी आली आहे . स्वामीजी मुंबईला जाणार असल्याची वार्ता वा-यासारखी सर्वदूर पोहचली आणि संस्थानवर भाविकांची रिघ लागली ,सत्कार करतांना विरह देखिल सहन होत नसल्याची साक्ष डोळ्यातील आश्रू देत आहे . पानसंबळ निवासस्थानी स्नेहभोजन व सत्कार ! मंगळवारी महंत विवेकानंद शास्त्री यांना बीडकरांनी निमंत्रीत केले ,अभियंता कृष्णा पानसंबळ व सामाजिक कार्यकर्त्या चंपाकाकी पानसंबळ यांचे निवासस्थानी स्नेहभोजन व पानसंबळ दामपत्याकडून सत्कार करण्यात आला . कालिकानगर मधे सत्कार सोहळा ! बीड येथील कालिका नगरमधे नवरात्र महोत्सवात एकाच किर्तनाने भाविकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते , कालिका नगर मधील भक्तगणांनी प्रा.भालचंद्र भांडेकर व गजानन जवकर यांचे निवासस्थानी सत्कार समारंभ संपन्न केला,आगमनाचे वेळी फुलांच्या पायघड्या आणि रांगोळीची सजावट व तोफांची सलामी देण्यात आली, यावेळी शिरूर नगरपंचायतचे प्रथम नगराध्यक्ष तथा कालिका देवी संस्थानचे अध्यक्ष रोहिदास पाटील यांचेसह बीडकर सचिन जवकर ,मधुकर भांडेकर ,सोमनाथ बारस्कर ,दिलीप कोकिळ ,सचिन वडगांवकर ,भारत पाखरे ,भाऊसाहेब गाडेकर ,प्रमोद गाडेकर ,सतिष सातपुते ,विजय गाडेकर ,गजानन जवकर ,भास्कर सातपुते, कल्याण तांबे, राज ससाणे. तांबे,अभिजित गाडेकर ,बडे ,नागरगोजे सह कालिकानगर परिवारातील बहुसंख्य महिला पुरूष भाविक उपस्थित होते.

◆ पान 9 वरून पुढे...

'ईव्हीएम स्ट्राँगरुमला...

नगरपालिकेची निवडणुक सर्वच नेते मंडळींनी प्रतिष्ठेची केली होती. मोठ्या प्रमाणात झालेल्या आरोप-प्रत्यारोपाने जिल्हाभरात पालिका निवडणुक गाजली. निवडणूकीतील मतदानयंत्रांच्या सुरक्षेसाठी स्ट्राँगरुम बाहेर राज्य राखीव बलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. मतपेट्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठा पोलिस बंदोबस्त स्ट्राँग रूमसह केंद्राच्या परिसरात ठेवण्यात आला आहे. त्यासाठी पोलिस कर्मचारी आणि अधिकारी असा मोठा फौजफाटा या परिसरात तैनात करण्यात आला. त्याच प्रमाणे स्ट्राँगरुम परिसरात सीसीटीव्ही बसविण्यात आले असून नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून त्यावर नजर ठेवली जात आहे.

बीडमध्ये तहसीलदारांची ...

जिल्हाधिकाऱ्यांना पाठवला असून या प्रकरणी विभागीय चौकशी करण्याची शिफारस जिल्हाधिकाऱ्यांकडे केली गेली आहे. त्या आदेशावर केलेल्या सह्या माझ्या नाहीत. ते आदेश मी काढलेले नाहीत. ते बनावट आदेश आहेत प्राथमिक चौकशी करुन अहवाल वरिष्ठांना दिलेला आहे. याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून कारवाई होईल. गुन्हा नोंद करण्यात येणार आहे राकेश गिड्डे, तहसीलदार, केज यांनी सांगितले

बीड शहरातील....

नगरपरिषदेचे लक्ष वेधण्यासाठी लेखी निवेदन सादर करून तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. कदम यांनी सांगितले की, शहराचा विस्तार मोठ्या प्रमाणात वाढला असला तरी नागरी मूलभूत सुविधांकडे आणि सुरक्षिततेकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. जम जम कॉलनीसह संपूर्ण शहरात मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे अत्यावश्यक झाले आहे. नागरिकांकडूनही नगरपरिषदेकडे सतत तक्रारी होत असून प्रशासकीय पातळीवर तत्काळ पावले उचलण्याची प्रतीक्षा सुरू आहे. अनेक रहिवाशांनी मोकाट कुत्र्यांमुळे रात्री उशिरा घरी परतणाऱ्या युवकांनाही त्रास होत असल्याचे सांगितले. शाळकरी मुलांचे पालकही वाढत्या धोक्यामुळे चिंतित आहेत.

बीड शहरामध्ये ...

कोटींची थकबाकी शिल्लक आहे. थकबाकी दारांवर कारवाईचा बडगा उगारत एप्रिल ते नोव्हेंबर २०२५ दरम्यान ५८ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे. महावितरणकडून वीज बिल मिळाल्यानंतर ते ३० दिवसाच्या आत न भरल्यानंतर प्रथम मोबाइलवर एसएमएस पाठवला जातो. तीच नोटीस असते. त्यानंतर कर्मचारी ग्राहकांची भेट घेऊन वीज बील भरण्यात असलेल्या अडचणी समजून घेऊन वीज बिल भरण्यास सांगितले जाते. मात्र, प्रतिसाद न दिल्यास कनेक्शन कट करण्याची प्रक्रिया राबवली जाते. तात्पुरते कनेक्शन कट केल्यानंतर ६ महिन्यांत थकबाकी भरल्यास पुरवठा पुन्हा सुरू केला जातो. अन्यथा कायमस्वरूपी कनेक्शन बंद केले जाते. बीड शहरातील थकबाकीचा आकडा हा १८ कोटीवर आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

ऊसतोडीसाठी निघालात ?...

गरोदर माता व बालकांवर विशेष लक्ष- ऊसतोड मजुरांमध्ये असलेल्या गरोदर महिलांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात आली. तसेच बालकांचे लसीकरण प्राधान्याने करण्यात आले.

बालकांचे लसीकरण - ५,७२०- आरोग्य विभागाने या कुटुंबांना योग्य आहार, लसीकरणाचे महत्त्व आणि प्रसूतिपूर्व तपासण्या कशा आवश्यक आहेत याबाबत मार्गदर्शन केले.

'हेल्थ कार्ड' कसे उपयुक्त ? मजूर ऊसतोडीसाठी दुसऱ्या राज्यात गेल्यानंतर तिथे उपचार मिळवणे अनेकांसाठी कठीण होते. पण आता हे हेल्थ कार्ड दाखवताच डॉक्टरांना मजुरांची संपूर्ण माहिती त्वरित मिळेल.

कार्डवर नमूद काय ? रक्तगट, पूर्वीचे आजार (उदा. दमा, हृदयविकार, मधुमेह), मागील उपचार, लसीकरणाची नोंद... यामुळे उपचार जलद मिळतील. योग्य औषधे देण्यात डॉक्टरांना सोय, आपत्कालीन स्थितीत वेळ वाचेल. चुकीच्या उपचारांची शक्यता कमी

सरकारी रुग्णालयात मिळणार उपचार- सर्व ऊसतोड मजुरांची तपासणी करून हेल्थ कार्ड दिले आहे. आजही मजुरांची तपासणी सुरूच आहे. कोणालाही त्रास जाणवल्यास जवळच्या कोणत्याही सरकारी रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावेत. - डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा आरोग्याधिकारी, बीड मोहीमेमुळे मजुरांना मिळणार मोठा दिलासा- ऊसतोडीच्या ठिकाणी अनेकदा अपघात, ताप, साप चावणे, पोटाचे विकार, गर्भवती महिलांना येणाऱ्या समस्या यांसारख्या तातडीच्या परिस्थितींना मजुरांना सामोरे जावे लागते. पण आता त्यांच्या हातात असलेले आरोग्य कार्ड त्यांचे 'आरोग्य ओळखपत्र' म्हणून काम करणार आहे. त्यामुळे उपचार मिळणे अधिक सोपे व सुरक्षित होणार आहे.

वाहनांची गती....

या सर्वांनंतरही नागरिकांकडून नियमांचे पालन न केल्याची वस्तुस्थिती कायम आहे आणि त्यामुळेच अपघातांचे प्रमाण कमी न होता वाढते आहे. पोलिसांचे म्हणणे आहे, की अपघात रोखण्याचे पहिले पाऊल म्हणजे प्रत्येक वाहनचालकाने स्वतःमध्ये शिस्त व जबाबदारी निर्माण करणे. नियोजित रस्त्याचा वापर, वेगावर नियंत्रण, वाहतुकीची चिन्हे जाणून नियम पाळणे आणि संरक्षणात्मक साधनांचा वापर हे चार मुद्दे अंगीकारले तर अनेक अपघात टाळता येऊ शकतात. दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करणे केवळ कायदेशीर बंधन नसून त्यांच्या सुरक्षेसाठी अत्यावश्यक आहे. रस्त्यांवरील बेफिकीर वेग आज अनेक कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त करत आहे. एका अपघाताचा फटका केवळ पीडितापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याच्या कुटुंबीयांवरही त्याचे आयुष्यभर परिणाम होत असतात. वाहन चालविताना वाहतुकीच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. चारचाकी वाहनचालकांनी सीटबेल्टचा, तर दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा. यामुळे अपघात व जीवितहानी टाळण्यास निश्चित मदत होईल.

◆ पान ४ वरून पुढे...

अनियंत्रित वेगच अपघाताला ठरतोय कारणीभूत- जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांतील बहुतांश अपघातांना अनियंत्रित वेग हे प्रमुख कारण असल्याचे दिसून आले आहे. राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची धाव अनियंत्रित असते. उजव्या बाजूऐवजी डाव्या बाजूने ओव्हरटेक करण्याच्या प्रवृत्तीमुळे देखील अपघाताची शक्यता वाढते. दुचाकीस्वारांच्या अपघातांमध्ये मोबाइलवर बोलणे व हेल्मेटचा अभाव ही कारणे पुन्हा-पुन्हा समोर येत आहेत.

अपघातांमागील प्रमुख कारणे- वेगावर नियंत्रण न ठेवता वाहन चालविणे. वाहतूक नियमांकडे दुर्लक्ष करणे. हेल्मेट न वापरणे किंवा सीटबेल्ट न लावणे. मद्यपान करून वाहन चालविणे. रस्त्यांची खराब अवस्था अपघाताला कारणीभूत ठरणे.

लिंबागणेश पंचक्रोशीतील...

निर्माण झाले होते. शेतकऱ्यांना रात्री कृषी पंप सुरू असताना पिकांना पाणी देण्यासाठी अंधारात शेतात जाण्याचा धोका वाढत होता. बिबट्याचा वावर लक्षात घेता त्यांच्या जीवितास गंभीर संकट निर्माण होत असल्यामुळे कृषी पंपासाठी दिवसा नियमित वीजपुरवठ्याची मागणी जोर धरत होती. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उद्या (दि.११) लिंबागणेश येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात रास्तारोको आंदोलन करण्याचा इशारा लेखी निवेदनाद्वारे दिला होता. अभियंत्यांसोबत चर्चेला सकारात्मक प्रतिसाद - मागणी मान्य. कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा देण्यास मान्यता दिली.यामुळे उद्या होणारे रास्तारोको आंदोलन स्थगित करण्यात आले असल्याची माहिती डॉ. गणेश ढवळे यांनी दिली. या चर्चेला आणि मागणीसाठी पुढाकार घेण्यात राजेंद्र मस्के (जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष - शरदचंद्र पवार गट) यांची प्रमुख उपस्थिती होती. कृषी पंपांना दिवसा वीजपुरवठा करण्याबाबत त्यांनी सहाय्यक अभियंता, उपकेंद्र लिंबागणेश आणि उपकार्यकारी अभियंता, बीड ग्रामीण विभाग यांना पत्रव्यवहाराद्वारे पाठपुरावा केला आहे. या बैठकीत बालासाहेब जाधव (सरपंच), राजेभाऊ आप्पा गिरे (माजी पंचायत समिती सदस्य), कल्याण वाणी (माजी सरपंच), रविंद्र निर्मळ (चेअरमन, सेवा सोसायटी), पत्रकार हरिओम क्षीरसागर, दामोदर थोरात, मोहन कोटुळे, बिभीषण मुळीक (सरपंच, पोखरी), बाळासाहेब वायभट (सरपंच, पिंपरनई), शहादेव कोल्हे, पांडुरंग वाणी, अँड. गणेश वाणी, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संतोष भोसले, अभिजित गायकवाड, सर्पमित्र अशोक जाधव, संतोष वाणी, संजय सुकाळे, तुकाराम गायकवाड, अंबादास ढास, अजित मंडलिक, बिभीषण वाणी, घाडगे गणेश, मुळे जीवन, सचिन गिरे, आरूण निर्मळ, रामदास मुळे, बंकट लगास, विलास वायभट, अभिमान वाणी, कृष्णा वायभट, रविंद्र ढास यांचा समावेश होता.

शेतातील रस्ता...

खंडू नामदेव ढवारे यांनी अडवला असून रहदारी करताना त्रास देत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

शिवाय पाठक यांच्या शेतातील पिके जोमदार अवस्थेत असताना शेजारील अमोल शामराव गुंजकर हे सर्व्हे नं.११४ मधील शेतातून तसेच वरील शेतकरी त्यांच्या पाईपलाईनद्वारे अनियंत्रितपणे पाणी दत्तात्रय पाठक यांच्या शेतात सोडून महाराष्ट्र जमीन महसूल १९६६ कलम ४९ भंग करत आहेत. यामुळे दत्तात्रय पाठक यांच्या शेतातील जवळपास दोन एकरवरील क्षेत्रातील पिकांचे संपूर्ण नुकसान वारंवार होत आहे. तसेच अर्जात दत्तात्रय पाठक यांनी नमूद केले आहे की, या अगोदर ही प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रारी दिल्या असूनही संबंधितांनी पाणी सोडण्याचे प्रकार थांबविले नाहीत. तसेच अडवलेला रस्ता देखील खुला करण्यात आला नाही. उलट तक्रार करू नये म्हणून दबाव आणणे व जीविताला धोका देणाऱ्या धमक्या देणे अशा घटनाही घडत असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे. तरी या सततच्या त्रासामुळे आणि मोठ्या नुकसानीमुळे कंटाळून शेतकरी दत्तात्रय पाठक यांनी तहसीलदार यांच्याकडे संबंधित शेतकऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, पिकांचे पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी अशी मागणी केली आहे. तरी दि.५ जानेवारी पूर्वी न्याय न मिळाल्यास तहसील समोर बेमुदत आंदोलनाचा इशारा मंगळवारी निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला आहे. दरम्यान दत्तात्रय पाठक यांच्यावर होत असलेल्या अन्यायामुळे ते निराश आहेत, त्यांची मोठी हानी होत आहे आणि वाद वाढत असल्याने गावातही या प्रकरणाची चर्चा सुरू असून प्रशासनाकडून तातडीने कारवाई होण्याची ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

डोईठाण-आष्टी...

बिबट्यांची हालचाल आपल्या कॅमेऱ्यात कैद केली. हे बिबटे काही वेळ रस्त्यावर फिरून बाजूच्या शेतात निघून गेले. सध्या हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, परिसरातील नागरिकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. या बिबट्यांच्या दर्शनामुळे परिसरातील नागरिकांच्या मनात भीतीचे वातावरण आहे, कारण ऑक्टोबर महिन्यात याच परिसरात एका शेतकऱ्याचा बिबट्याच्या हल्ल्यात बळी गेला होता. १३ ऑक्टोबर रोजी बावी गावात राजेंद्र विश्वनाथ गोल्हार (वय ३६) हे शेतकरी जनावरं घेऊन शेतात गेले असताना दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला करत त्यांचा फडशा पाडल्याची दुर्दैवी घटना घडली होती.

मानवी हक्कामुळे...

पाहुणे प्रा.सोमनाथ घाडगे यांनी मानवी हक्का चे महत्व सांगितले.या प्रसंगी लोकप्रशासन विभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मानवी हक्क दिन या भित्तीपत्रकाचे अध्यक्ष व मान्यवरांच्या शुभहस्ते विमोचन करण्यात आले.या कार्यक्रमाचे आभार प्रा.बंडू लोखंडे यानी व्यक्त केले.या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद,व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

शिरूर येथे...

मनिषा पोटभरे (पांगरी) प्रतिभा मंडलिक (गोमळवाडा) श्रीकांत देवढे (तिंतरवणी) जितेंद्र सांगळे (तागडगाव) आरती सोनवणे (हिवरसिंगा) उद्धव परदेशी (आर्वी) शीला सोनवणे (फुलसांगवी) सुनील परजणे (खालापुरी) यांना प्रदान करण्यात येणार आहेत. तसेच कावेरी नागरगोजे (शांतीवन) आर्वी, कोमल तांबे (आजोळ) राक्षसभूवन, सृष्टी सोनवणे (सर्पराज्ञी) तागडगाव, मयुरी राजहंस (सेवाश्रम) येळंब ब्र. सोनाली गायकवाड (सेवातिर्थ) मातोरी यांना सिंदफणा सेवागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. कलेच्या क्षेत्रात विष्णू केदार (वारणी) सिनेकलावंत, केशव बडे (वारणी) ध्वनीकला, तुळशीराम काळे (मातोरी) नाट्य यांना सिंदफणा कलागौरव तसेच जिल्ह्यातील आठ यशस्वी स्पर्धकांना जिल्हास्तरीय सिंदफणा वक्तागौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. निवड समितीने हे गौरव पुरस्कार जाहीर केले आहेत.

एक लढा...

पीकविमा दावे, बाजार समित्यांचे प्रश्न अशा अनेक मुद्द्

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील पाल्यांना रोजगारासाठी कौशल्य प्रशिक्षण द्यावे : जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

जिल्ह्यात आत्महत्याग्रस्त शेतकरी बाधवाच्या कुटुंबातील मुला, मुलींना किमान कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण देण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी दिले . जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यताविभागाची जिल्हा कार्यकारणी समितीच्या

बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस जिल्हा कौशल्य ,रोजगार उद्योजकता विभागाचे सहाय्यकआयुक्त राजू वाकोडे, शिक्षणाधिकारी माध्यमिकच्या अश्विनी लाठकर, शासकीय तंत्रनिकेतनचे उपसंचालक प्रदीप दुर्गे,प्राचार्य. अभिजीत आलटे,,सिपेट प्रशिक्षण संस्थाचे व्यवस्थापक आर जीवन राम, , इंडो जर्मन टूल्स कंपनी व्यवस्थापक जयेश बागुल, छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयाचे कमलाकर कदम, अटल इंक्युबेशन सेंटरशेख नवीद, देवगिरी शासकीय तंत्र निकेतन संस्था एस, जी .गोस्वामी यासह विविध प्रशिक्षण संस्थांच्या समन्वयक आणि प्राचार्य यांची उपस्थिती होती. जिल्हास्तरीय किमान कौशल विकास कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण उपक्रमामध्ये जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील तरुण, तरुणींना प्रशिक्षण देण्याचे नियोजन करावे. तसेच जिल्ह्यातील सैन्य दलातील निवृत्त झालेल्या माजी सैनिक आणि त्यांच्या पाल्यांनाही प्रशिक्षणास प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज बैठकीत दिले. कौशल्य, रोजगार ,उद्योजकता व नावीन्यता जिल्हा कार्यकारणी समितीच्या अंतर्गत असणाऱ्या विविध प्रशिक्षण संस्था ,शासकीय संस्था, अर्ध शासकीय आणि खाजगी कंपन्यांच्या प्रशिक्षण संस्थेच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये कुशल आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण व्हावे. आगामी काळातील पाच वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक कंपन्यांची गुंतवणूक आणि निर्मिती जिल्ह्यामध्ये होत असून या कंपन्यांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देऊन जिल्ह्याचा रोजगार निर्मितीमधील सहभाग मोठ्या प्रमाणात असावा यासाठीचे प्रशिक्षण वर्ग आणि त्याचे आयोजन , नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज संबंधित प्रशिक्षण संस्था आणि जिल्हा कौशल्य विकास

सशस्त्र सेना ध्वजदिन निधी २०२५ संकलन शुभारंभ कार्यक्रम ११ डिसेंबर रोजी

धाराशिव । प्रतिनिधी

दर वर्षीप्रमाणे ७ डिसेंबर हा दिवस सशस्त्र सेना ध्वजदिन म्हणून साजरा केला जातो.यावर्षी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनाचा शुभारंभ कार्यक्रम ११ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमामध्ये उत्कृष्ट संकलनाबाबत मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असून वीरपत्नी, वीरमाता,वीरपिता यांचा सत्कार, तसेच माजी सैनिकांना आर्थिक मदतीचे धनादेश वाटप केले जाणार आहे.त्याचबरोबर विशेष गौरव पुरस्कार प्राप्त पाल्यांचा देखील सत्कार करण्यात येणार आहे. माजी सैनिक, वीरपत्नी, वीरमाता, वीरपिता व त्यांचे अवलंबित यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, धाराशिव यांनी केले आहे.

ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध : प्र. अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे

जालना । प्रतिनिधी

जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट ग्राहकांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे असे आहे. तसेच ग्राहकांच्या तक्रारींची त्वरित सोडवणूक करणे हे देखील परिषदेचे कार्य आहे. या उद्देशांसाठी, जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेने ग्रामीण भागात विविध माध्यमांद्वारे ग्राहक जनजागृतीसाठी विशेष मोहीम राबवावी. तसेच जालना जिल्ह्यातील ग्राहकांना तक्रार नोंदविण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध असून त्याचा

लाभ घ्यावा, असे आवाहन प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी केले आहे. जिल्ह्यातील ग्राहकांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक प्रभारी अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात संपन्न झाली. यावेळी जिल्हा पुरवठा अधिकारी तथा ग्राहक संरक्षण परिषदेच्या सचिव सविता चौधर यांच्यासह ग्राहक संरक्षण परिषदेचे शासकीय व अशासकीय सदस्य उपस्थित होते.

सध्या अनेक विभागांनी तक्रारी नोंदवण्यासाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. ग्राहकांनी या सुविधेचा वापर करून आपल्या तक्रारी ऑनलाइन नोंदवाव्यात. तसेच, पळल.क्षरश्रपर या संकेतस्थळावर ग्राहकांच्या समस्यांसाठी पोर्टल उपलब्ध आहे. जिल्ह्यात राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन दि.२४ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात येणार असून सर्व सदस्यांनी ग्राहक दिन साजरा करण्याबाबत आपल्या संकल्पना सांगाव्यात.

प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याला हॉलीबॉल स्पर्धेत सुवर्णपदक

नेकनूर । प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अश्वमेध क्रीडा महोत्सव २०२५ मध्ये निवड झालेला विद्यार्थी सय्यद मुजतहिद अन्वर याला अंतर विद्यापीठीय हॉलीबॉल स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य डी. के. ढास यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अंतर विद्यापीठीय अश्वमेध क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत ०८ ते १२ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये हॉलीबॉल स्पर्धा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झाली. या स्पर्धेसाठी एकूण २२ विद्यापीठीय हॉलीबॉल संघांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये के. बी. पी.वि. सातारा संघावर मात करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संघाने सुवर्णपदक मिळविले. या संघामध्ये प्रमिलादेवी पाटील महाविद्यालयातील विद्यार्थी सय्यद मुजतहिद अन्वर सुवर्णपदक मिळवून महाविद्यालयाचा सन्मान वाढविला. यानिमित्ताने माऊली विद्यापीठ, केज संस्थेचे अध्यक्ष मा. अशोकराव पाटील , मा. खा. रजनीताई पाटील ,

दिव्यांग बांधवांचे कोणतेही प्रश्न यंत्रणांकडे प्रलंबित राहू नये: जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

● दिव्यांगांप्रती संवेदनशीलता व जाणीव जागृती कार्यशाळा

धाराशिव । प्रतिनिधी

दिव्यांगांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी सर्व विभागाचा समन्वय असणे आवश्यक आहे. दिव्यांग हक्क अधिनियम हा कायदा देखील आहे. या कायद्याने त्यांचे मूलभूत अधिकार व कर्तव्य हे निश्चित केले आहे. दिव्यांग बांधव हा समाजाचा एक महत्त्वाचा घटक आहे. दिव्यांग बांधवांना विविध योजनांचा लाभ मिळवून देताना त्यांचे कोणतेही प्रश्न यंत्रणांकडे प्रलंबित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले.

आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ कलम ३९ अन्वये दिव्यांगाप्रती संवेदनशीलता जागृती कार्यशाळेत अध्यक्षस्थानावरून श्री. पूजार बोलत

होते. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव न्या.भाग्यश्री पाटील, केंद्र सरकारच्या दिव्यांग व्यक्ती सशक्तीकरण समितीचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश काळे, निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी देवदत्त गिरी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास, जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी सचिन इगे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) नागेश मापारी, कौशल्य विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय गुरव, नवजीवन अपंग प्रशिक्षण संस्थेचे संस्थापक चंद्रकांत जाधव, महाराष्ट्र राज्य दिव्यांग संघटनेचे संस्थापक अध्यक्ष आप्पा ढोके व प्रहार संघटनेचे मराठवाडा अध्यक्ष मयूर काकडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. श्री.पूजार म्हणाले की, विविध योजनांचे अभिसरण करून दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. विविध आरोग्यविषयक शिबिरांचे त्यांच्यासाठी आयोजन करण्यात येत असून यामधून त्यांना दिव्यांग वैश्विक ओळखपत्र देण्यात येत आहे. दिव्यांग बांधवांना लागणाऱ्या सहायक उपकरणांसाठी शिबिरांचे देखील आयोजन करण्यात येत आहे. दिव्यांग बांधव योजनांच्या लाभांपासून वंचित राहणार नाही याचा प्रयत्न करण्यात येत आहे, असे त्यांनी सांगितले.

एड्स जनजागृती अभियान राबविणे आजच्या काळाची गरज : श्री. सुहास कुलकर्णी

बीड । प्रतिनिधी

सौ. के.एस.के महाविद्यालय व रेड रिबन क्लब आणि जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, जिल्हा रुग्णालय बीड यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये एड्स जनजागृती अभियान संपन्न झाले.

यावेळी मार्गदर्शन करताना आयसीटीसीचे कार्यक्रमाधिकारी श्री. सुहास कुलकर्णी म्हणाले की, एच.आय.व्ही चे प्रमाण हे महाराष्ट्रात बीड जिल्हयामध्ये कमी असून हेच आजपर्यंत केलेल्या एड्स जनजागृती अभियानाचे फलीत आहे. आजच्या तरुण तरुणींनी विवाह करताना

एच.आय.व्ही. ची तपासणी करुनच लग्न करावे. माता जरी पॉझीटीव्ह असली तरी जन्माला येणारे अपत्य हे पॉझीटीव्ह असेलच असे नाही. अपत्य हे एच.आय.व्ही. बाधीत नसते. असे अनेक उदाहरणे समाजात आहे. यावेळी मार्गदर्शन करताना आयसीटीसीचे समुपदेशक श्री. जनार्धन माजपल्ले म्हणाले की, एड्स या रोगास घाबरण्याचे कारण नाही कारण हा रोग संसर्गजन्य नाही. या आजाराबाबत फारशी जागृकता नसल्यामुळे दरवर्षी जनजागृती अभियानाची आवश्यकता पडते. हा आजार असा आहे की वेळीस उपचार घेतल्यानंतर आजारावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. आजही लोकांच्या मनात अनेक समज गैरसमज आहेत. ते दुरु करणे हे या अभियानाचे प्रमुख कार्य आहे. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला . या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. जालिंदर कोळेकर हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. बालासाहेब पोटे तर आभार डॉ. यादव घोडके यांनी मानले. या कार्यक्रमास प्राध्यापक व स्वंयसेवक बहुसंख्येने उपस्थित होते.

अत्याचारात मृत्यू प्रकरणी मृताच्या वारसांना नोकरी देण्याचा निर्णय; जिल्ह्यात ३१ प्रकरणात पात्र वारसांना दस्ताऐवज दाखल करण्याचे आवाहन

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियमांतर्गत दाखल प्रकरणात मृत्यू झाला असल्यास मयताच्या पात्र वारसाला नोकरी देण्याचा निर्णय शासनाने घेतला असून यासंदर्भातील शासन निर्णय दि.२० नोव्हेंबर रोजी निर्गमित केला आहे. सन २०१२ ते २०२५ या कालावधीत जिल्ह्यातील ३१ प्रकरणात मयतांच्या वारसांना नोकरी देण्यासाठी प्रक्रिया सुरु करण्यात आली असून मयताच्या वारसांनी सहायक आयुक्त समाज कल्याण यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. शासन निर्णयानुसार सन २०१२ ते २०२५ याकालावधीतील पिडीत मयतांच्या वारसांना नोकरी देण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एकून ३१ प्रकरणात पिडीत व्यक्तिंचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. या ३१ प्रकरणातील मृतांच्या वारसांनी सहायक आयुक्त समाज कल्याण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवाजी हायस्कूल जवळ, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे संपर्क साधावा. शासन निर्णयात नमूद केल्यानुसार परिशिष्ट १ ते ६ मध्ये नमूद दस्तऐवजांसह वारसांनी अर्ज करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व सहायक आयुक्त आर.एम. शिंदे यांनी केले आहे.

कष्टकऱ्यांचा एक लढवय्या सामाजिक कार्यकर्ता महाराष्ट्राने गमावला आहे : ॲड. सुभाष राऊत

समता परिषदेच्यावतीने स्व. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या सामाजिक, श्रमिक आणि समता चळवळीतील एक महान दीपस्तंभ, ज्येष्ठ समाजसेवक डॉ. बाबा (पांडुरंग) आढाव यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्र शोकाकुल झाला असून महाराष्ट्राने एक अद्वितीय विचारवंत, सत्यशोधक परंपरेचा निष्ठावंत अनुयायी आणि कष्टकऱ्यांचा एक लढवय्या सामाजिक कार्यकर्ता गमावला असल्याचे प्रतिपादन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांनी केले आहे. बीड जिल्हा समता परिषदेच्यावतीने स्व. बाबा आढाव यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी ड. सुभाष राऊत म्हणाले की, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक समाजाची धुरा सांभाळणारे हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजूर आणि असंघटित कष्टकरी वर्गाला संघटित करून त्यांना सन्मान, हक्क आणि न्याय मिळवून देण्यासाठी आयुष्यभर अविरत लढा देणारे बाबा आढाव आज आपल्यातून निघून गेल्याने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. 'हमाल पंचायती'ची स्थापना असो किंवा 'एक गाव – एक पाणवठा' या सारख्या सामाजिक क्रांतीला दिलेल्या नेतृत्वातून आणि त्यांच्या चळवळींनी महाराष्ट्राच्या सामाजिक पटावर अविस्मरणीय छाप सोडली. समता, मानवी मूल्ये आणि संघर्षातून परिवर्तन या तीनही स्तंभांवर त्यांनी उभी केलेली लढाई आजही सामाजिक कार्यकर्त्यांसाठी दिशादर्शक आहे. शहरातील कामगारांना स्वस्तात, पौष्टिक जेवण मिळावे म्हणून त्यांनी सुरू केलेला 'कष्टाची भाकर' हा उपक्रम तर त्यांच्या लोकाभिमुख विचारसरणीचे सर्वोत्तम उदाहरण आहे. भिडे वाड्यातील क्रांतीसुर्य महात्मा फुलेंनी सुरू केलेल्या शाळेचे पुनरुज्जीवन तथा नूतनीकरण आणि स्मारक उभारणीसाठीच्या संघर्षात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त जागृती कार्यक्रम

परभणी । प्रतिनिधी

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने परभणी जिल्हा कारागृहात मानवी हक्क व संरक्षणाबाबत जागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सचिव भुषण काळे, जिल्हा कारागृह अधीक्षक राजेंद्र मरळे, तुरुंगाधिकारी श्रेणी–२ श्रीमती स्वाती जाधवर, तसेच ॲड. लायबा बेग आणि ॲड. वामन वाघमारे उपस्थित होते.

दिव्यांगासाठी वैयक्तिक स्वरुपाच्या योजना ; लाभ घेण्याचे आवाहन

परभणी । प्रतिनिधी

सन २०२५–२६ या वर्षासाठी जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नातून ५ टक्के दिव्यांग कल्याणार्थ राखीव निधीचा उपयोग करून ग्रामीण भागातील दिव्यांगांसाठी वैयक्तिक स्वरूपाच्या योजना राबविण्यात येत आहेत. संबंधित योजनांसाठीचे अर्ज www.sakshamparbhani.in या पोर्टलवरून ऑनलाईन पद्धतीने मागविण्यात येत असल्याची माहिती जिल्हा दिव्यांग कल्याण अधिकारी आर. व्ही. चकोर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे. ० ते ६ वयोगटातील दिव्यांग मुलांच्या उपचारासाठी माता/पालकांना निर्वाह भत्ता : या योजनेअंतर्गत उपचाराच्या काळात दिव्यांग मुलांच्या पालकांना आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे. अर्हता व आवश्यक कागदपत्रे : वयोमर्यादा : ० ते ६ वर्षे, ४० टक्के व त्यावरील युडीआयडी वैद्य दिव्यांग प्रमाणपत्र, सन २०२५–२६ चे तहसिलदार यांनी दिलेले पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र (मर्यादा – रु. १ लाख), ग्रामीण भागातील रहिवासी दाखला, बँक पासबुक, राशन कार्ड, जन्मतारखेचा पुरावा – जन्म प्रमाणपत्र, टी.सी., आधार, सनद. इच्छुकांनी संबंधित योजनेसाठीचे दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ऑनलाईन सादर

जनजागृती, समन्वय आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर काम केल्यास अपघातांना आळा बसेल

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील रस्ते अपघात रोखण्यासाठी जनजागृती मोहिम राबाविणे अत्यंत आवश्यक आहे. तसेच रस्ते अपघात रोखण्यासाठी पोलिस, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वय ठेवून काम करावेत. जनजागृती, समन्वय आणि अंमलबजावणी या त्रिसूत्रीवर काम केल्यास जिल्ह्यातील अपघातांना निश्चितच आळा बसेल, असे प्रतिपादन अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी यांनी केले.जिल्ह्यात

अपघात रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याच्या दृष्टीने नुकतीच एक महत्त्वाची रस्ता सुरक्षा विषयक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस प्र.अपर जिल्हाधिकारी नम्रता चाटे, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता स्मिता पवार यांच्यासह संबंधित यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

अपघात कमी करण्यासाठी शाळा–महाविद्यालयांमध्ये जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तरुणांमध्ये सुरक्षित वाहतूक नियमांबद्दल जागरूकता निर्माण करणे हे दीर्घकालीन सुरक्षिततेसाठी महत्त्वाचे ठरेल. केवळ नियम बनवून चालणार नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आणि अपघात प्रवण ठिकाणे सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. असेही त्यांनी सांगितले. यावेळी जिल्ह्यात घडलेल्या मोटार वाहन अपघाताच्या प्रकरणाचा मागील तीन वर्षातील संख्येचा आढावा घेण्यात आला.

जाहीर प्रगटन

धारुर येथिल श्री एन.एम वाली दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांच्या न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज ७८/२०२३

सुभाष वि मुद्रिकाबाई

वादप्रश्न नक्की करण्याकरीता गैरअर्जदारास समन्स

प्रति, प्रतीवादी :– ४. रूक्मीण प्र. अनुरथ सपाटे, वय ७० वर्षे धंदा घरकाम रा विटा ता. पाथरी जि. परभणी

ज्याअर्थी अर्जदार यांनी यांनी तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे. त्याअर्थि त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सकाळी ११–०० वाजता तुम्ही स्वतः किंवा ज्यास योग्यरीत्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादासंबधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देउ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात समन्स प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत उपस्थित राहून लेखी कैफियत दाखल करणेसाठी या व्दारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की, त्या दिवशी तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद किंवा प्रतिवाद ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तूमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या बचावाच्या किंवा उलट वादाच्या किंवा प्रतिवादाच्या पुष्ठर्थ, पुरावा म्हणुन तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्तऐवजाची एक सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमुद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनूपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल,

आणखी. अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस किंवा तत्पूर्वी बजावणीकरिता तुमचा पत्ता दुखिल करण्यांत तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल.

आज दिनांक १०/१२/२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून
(स्वाक्षरीत)
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर, जि. बीड

शिक्का

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
मराठवाडा पत्र
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ११ डिसेंबर २०२५ ● पान ४

ऊसतोडीसाठी निघालात ? जपा तुमचे 'हेल्थ कार्ड' प्रत्येक ठिकाणी होणार फायदा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा हा महाराष्ट्रातील ऊसतोड मजुरांचा सर्वात मोठा जिल्हा म्हणून ओळखला जातो. दरवर्षी तब्बल एक लाखाच्या आसपास मजूर ऊसतोडीसाठी कर्नाटकासह विविध राज्यांकडे स्थलांतरित होतात. या वर्षीही जिल्ह्यातील सुमारे ९३ हजार १०२ मजूर ऊसतोडीसाठी रवाना झाले आहेत. स्थलांतरित मजुरांना वारंवार आरोग्य समस्या भेडसावत असल्याने, यंदा बीड जिल्हा आरोग्य विभागाने एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबवला आहे 'हेल्थ कार्ड' मोहीम. बीड जिल्हा आरोग्य विभागाचा हा उपक्रम हजारो मजुरांसाठी आश्वासक ठरत आहे. स्थलांतरित कामगारांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. 'हेल्थ कार्ड' ही छोट्या आकाराची पण मोठा उपयोग असलेली योजना ठरली आहे.

जिल्हा आरोग्य विभागाने मजुरांच्या स्थलांतरापूर्वी गावोगावी आरोग्य शिबिरे आयोजित केली. महिला आणि पुरुष मजुरांची संपूर्ण आरोग्य तपासणी करून त्यांची सविस्तर माहिती नोंदवण्यात आली. या नोंदींच्या आधारे सर्व मजुरांना 'आरोग्य कार्ड' वितरित करण्यात आले.

वितरित हेल्थ कार्ड – ९२,४४५, तपासणी केलेले ऊसतोड मजूर – ९३,१०२, पुरुष – ५०,०६९, महिला – ४३,०३३

ही मोहीम जिल्हा आरोग्याधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, सहायक आरोग्याधिकारी डॉ. रौफ शेख, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, तसेच डॉ. विकास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. ▶▶ उर्वरित पान २ वर

वाहनांची गती वाढली, जीवनाची मंदावली

रस्ते अपघातात अकरा महिन्यांत 399 बळी, दुचाकींचे प्रमाण सर्वाधिक

बीड । प्रतिनिधी

आजच्या धावपळीच्या युगात वेळेला अनन्यसाधारण महत्त्व असले, तरी मानवी जीवन हा त्याहूनही मौल्यवान ठेवा आहे. वेळ आणि गतीसोबतची स्पर्धा जिंकण्याच्या नादात अनेकांचे जीवन 'ब्रेक' लागून थांबत आहे, हे वास्तव धक्कादायक आहे. बीड जिल्ह्यात मागील अकरा महिन्यांत तब्बल ३४७ अपघात झाले असून यात ३९९ जणांचा मृत्यू झाला. याशिवाय ४९१ जण जखमी झाले आहेत. विशेष म्हणजे सर्वाधिक बळी दुचाकीस्वारांचे असल्याचे पोलिस नोंदीत स्पष्ट दिसते.

वाहन चालविताना हेल्मेटचा वापर न करणे, वाहनाचा अनियंत्रित वेग, मोबाइलवर बोलत वाहन चालविणे व ओव्हरटेक करताना नियमांकडे दुर्लक्ष करणे ही अपघाताची प्रमुख कारणे असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. जिल्ह्यात वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, त्यात दुचाकींचे प्रमाण सर्वाधिक आहे.

राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग तसेच ग्रामीण रस्त्यांवर दररोज अपघाताच्या घटना नोंदवल्या जात आहेत. बहुतांश अपघात चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करताना किंवा सुसाट वेगामुळे झालेले आहेत. हेल्मेटचा वापर टाळणे आणि मोबाइलवर बोलणे हेही दुचाकी अपघातांचे मोठे कारण ठरले आहे. जिल्हा पोलिस दल व वाहतूक शाखेने अपघात कमी करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत. अपघातप्रवण स्थळे शोधून 'ब्लॅकस्पॉट' निश्चित करण्यात आले. ▶▶ उर्वरित पान २ वर

● जनजागृती गरजेची ●

अपघातांचा वाढता आलेख पाहता प्रशासनाने आणखी कडक पावले उचलण्याची गरज आहे. वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कठोर दंड, वाहन तपासणी मोहीम, शाळा–महाविद्यालयांमध्ये वाहतूक सुरक्षा जनजागृती, ग्रामीण भागात वेगमर्यादा फलकांची उभारणी यांची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे होण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. जीवनाची गती वाढवताना जीवनाची माती होऊ नये, हा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याची वेळ आता आली आहे.

●अपघात, जखमी व मृतांची संख्या

महिना - जखमी - मृत्यू
जानेवारी - ५७ - ४०
फेब्रुवारी - २८ - ४१
मार्च - ३६ - ३९
एप्रिल - ४४ - ३६
मे - ४९ - ४१
जून - ३९ - ४६
जुलै - ५० - २७
ऑगस्ट - ५१ - ३९
सप्टेंबर - ५२ - २६
ऑक्टोबर - ४५ - ३६
नोव्हेंबर - ४० - २७

लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा

● कृषी पंपासाठी दिवसा विद्युत पुरवठ्याची मागणी मान्य : राजेंद्र मस्के
● उद्याचा रास्तारोको आंदोलन स्थगित: डॉ. गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

सकाळी महावितरण उपकेंद्र लिंबागणेश येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या पुढाकारातुन सहाय्यक अभियंता महेश गायकवाड यांच्याशी डॉ. गणेश ढवळे, ग्रामस्थ आणि शेतकऱ्यां सोबत चर्चा झाली. ग्रामस्थांची अडचण समजून घेत त्यांनी कृषी पंपांसाठी रात्रीऐवजी दिवसा वीजपुरवठा

देण्यास मान्यता दिली.अशी माहिती राजेंद्र मस्के यांनी दिली आहे. या निर्णयामुळे लिंबागणेश पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून उद्याचा रास्ता रोको आंदोलन स्थगित केले आहे. असे समाजसेवक डॉक्टर गणेश ढवळे यांनी सांगितले आहे.

लिंबागणेश परिसरात बिबट्या आढळून आल्याने पिंपरनई, पोखरी (घाट), बेलगाव, सोमनाथवाडी, मसेवाडी, मोरगाव–फुकेवाडीकाळेवाडी, गणेशनगर अशा पंचक्रोशीतील गावांमध्ये ग्रामस्थ व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण ▶▶ उर्वरित पान २ वर

शेतातील रस्ता अडवला; पाईपलाईनचे पाणी जाणीवपूर्वक सोडून शेतीपिकांचे नुकसान

शनीचे राक्षसभुवन येथील प्रकार ; शेतकरी दत्तात्रय पाठक यांची तहसीलदारांकडे धाव, उपोषणाचा इशारा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन गावातील शेतकरी दत्तात्रय विष्णूपंत पाठक यांच्या शेताकडे जाणारा रस्ता गावातील काही शेतकऱ्यांनी अडवला आहे. त्याचबरोबर शेतातील पाईपलाईनचे पाणी सतत व जाणीवपूर्वक दत्तात्रय पाठक यांच्या शेतात सोडल्याने सदरील शेतातील तुर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या झालेल्या नुकसानीबाबत पाठक यांनी तहसीलदारांकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. मात्र दीर्घकाळापासून सुरू असलेल्या या

वादाला अद्याप तोडगा न निघाल्याने दत्तात्रय पाठक या शेतकऱ्यांची मोठी आर्थिक हानी झाली असून त्यांनी तहसील प्रशसानाविरोधात संताप व्यक्त केला आहे. तरी न्याय न मिळाल्यास दि.५ जानेवारी रोजी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. शनीचे राक्षसभुवन येथील शेतकरी दत्तात्रय पाठक पाठक यांच्या गट क्रमांक १२२ मधील शेताकडे जाणारा रस्ता गावातील रमेश खंडेराव पाठक, योगेश रमेश पाठक, दिपक रमेश पाठक, नामदेव मसु ढवारे, ▶▶ उर्वरित पान २ वर

नियंत्रण सुटल्याने दुचाकी सिमेंटच्या बाकड्याला आदळली ; पतीचा मृत्यू, पत्नी गंभीर जखमी

न्हावरे । प्रतिनिधी

बीड महामार्गावर निर्वी (ता. शिरूर) येथे भरधाव दुचाकी रस्त्याच्या कडेच्या सिमेंटच्या बाकडावर आदळून झालेल्या अपघातात पतीचा मृत्यू झाला असून पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना रविवारी (दि.७) सायंकाळी घडली. बाळू भीमा बरकडे (वय २८, ,रा. दत्तनगर, मलठण ता. शिरूर) असे अपघातातमृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांची पत्नी कोमल बाळू बरकडे (वय २४) ही गंभीर जखमी झाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी बाळू बरकडे हे पत्नीसह त्यांची मोटारसायकल घेऊन शिरसगाव काटा येथील नातेवाईकांना भेटण्यासाठी गेले होते. शिरसगाव येथून पुन्हा मलठणकडे परत जात असताना वेगात निर्वी येथे असलेल्या वळणावर त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले. दुचाकी रस्त्याच्या कडेला बसण्यासाठी मांडलेल्या सिमेंटच्या बाकडावर जाऊन आदळली. यामध्ये बरकडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली तर पाठीमागे बसलेली त्यांची पत्नी गंभीर जखमी झाली. दरम्यान ग्रामस्थांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. दरम्यान उपचार सुरू असताना त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी तपासून घोषित केले. याप्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलिस हवालदार प्रताप टेंगले हे करत आहेत.

डोईठाण-आष्टी रस्त्यावर दोन बिबट्यांचा 'नाइट वॉक'; शेतकरी, प्रवाशांमध्ये दहशत!

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील किन्ही गावाजवळ रहदारीच्या रस्त्यावर एकाच वेळी एक–दोन नव्हे तर तब्बल तीन बिबटे आढळून आल्यामुळे प्रवाशांच्या मनात मोठी धडकी भरली आहे. एका प्रवाशाने प्रसंगावधान राखून आपल्या कॅमेऱ्यात कैद केलेला हा थरारक व्हिडिओ सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. ऑक्टोबर महिन्यात याच परिसरात बिबट्याने एका शेतकऱ्याचा बळी घेतल्यामुळे नागरिकांमध्ये आता प्रचंड भीतीचे वातावरण पसरले आहे. पुलाजवळ 'तीन' बिबट्यांचा मुक्त संचार– मंगळवारी रात्रीच्या सुमारास डोईठाण–आष्टी रस्त्यावरील किन्ही गावाजवळच्या पुलाजवळ एका प्रवाशाला अचानक तीन बिबटे रस्त्यावर दिसले. प्रवासी बिबट्यांना पाहून घाबरले, मात्र त्यांनी प्रसंगावधान राखून ▶▶ उर्वरित पान २ वर

● काळजी घेण्याचे आवाहन ●

या घटनेची कटू आठवण ताजी असतानाच आता तीन बिबटे दिसल्यामुळे बीडसांगवी, कोहिणी, बावी, दरेवाडी, किन्ही आणि परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर न पडण्याचे आणि फिरताना अत्यंत काळजी घेण्याचे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. वन विभागाने तातडीने या बिबट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

मानवी हक्कामुळे माणसाला स्वाभिमानाने जगता येते ! : प्राचार्य डॉ.विश्वास कदम

जयभवानीत मानवी हक्क दिन साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

मानवी हक्कामुळेच माणसाला स्वाभिमानाने जगता येते.असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.विश्वास कदम यानी केले.जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा येथे लोकप्रशासन व राज्यशास्त्र विभाग आयोजित जागतिक मानवी हक्क दिन कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणुन बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की माणुस जन्मत:च काही हक्क घेऊन जन्माला येतो.व त्या हक्कामुळेच त्याला स्वाभिमानाने जिवन जगण्याचा आधिकार मिळतो.म्हणुन मानवी हक्काचा प्रसार व प्रचार होणे गरजेचे आहे.हे मानवी हक्क आपण समाजातील सर्व घटकापर्यंत प्रसारीत केले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणुन इतिहास विभागाचे प्रमुख प्रा.सोमनाथ घाडगे हे होते.तर व्यासपीठावर लोकप्रशासन विभागाच्या प्रमुख प्रा.श्रीमती कल्पना घारगे यांची उपस्थित होत्या.या कार्यक्रमाचे संचलन व प्रस्तावीक प्रा.श्रीमती कल्पना घारगे यांनी केले.या प्रसंगी प्रमुख ▶▶ उर्वरित पान २ वर

शिरूर येथे सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलनलाच्या अध्यक्षपदी अमर हबीब यांच्या उपस्थितीत ; सिंदफणा गौरव पुरस्कार जाहीर

शिरूर का. । प्रतिनिधी

सातवे सिंदफणा मराठी साहित्य संमेलन शिरूर कासार येथे दि. १६ ते १७ डिसेंबर दरम्यान होत आहे. सिंदफणा नदीच्या काठावर शिरूर तालुक्यात अनेक गुणीजनांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला असुन शिक्षण, सेवा, शेती, कला या क्षेत्रातील काही उत्कृष्ट कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना सिंदफणा गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. व या संमेलनाला ज्येष्ठ साहित्यिक अमर हबीब यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे , तसेच मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सिंदफणा सेवाभावी संस्थेच्या विद्यमाने एकलव्य विद्यालयात साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सिंदफणा शेतीगौरव अर्जुन पाखरे (मानूर) योगेश बडे (लोणी) विष्णूपंत बेदरे (राक्षसभूवन) पोपटराव कोकाटे (मार्कडवाडी) जगन्नाथ गाडेकर (शिरूर) यांना तर सिंदफणा शिक्षण सेवागौरव पुरस्कार गोरक्ष खेडकर (शिरूरकासार) आशा ढाकणे (रायमोहा) शीतल काळदाते (मानूर) भागवत मेहेत्रे (जाटनांदूर) ▶▶ उर्वरित पान २ वर

एक लढा मातीसाठी : कापूस–सोयाबीन उत्पादक शेतकरी व्यापक जनआंदोलनाच्या तयारीत

भाववाढीसाठी बीड जिल्ह्यात गावा-गावात शेतकऱ्यांची जमवाजमव सुरु

बीड । प्रतिनिधी

उसाच्या भाववाढीसाठी झालेल्या राज्यव्यापी आंदोलनानंतर आता बीड जिल्ह्यातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकरी सरकारविरोधात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारण्यासाठी सज्ज झाले आहेत. शेतमालाला हमीभाव न मिळाल्याने, उत्पादन खर्चापेक्षा बाजारभाव कमी असल्याने आणि सातत्याने होत असलेल्या आर्थिक तोट्यामुळे शेतकऱ्यांच्या असंतोषाला उधाण आले आहे. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात शेतकरी, शेतकरी पुत्र व युवा नेतृत्व हे गावा–गावातील बैठकींद्वारे सबंध जिल्ह्यात जनआंदोलनाचे

जाळे विणण्यात गुंतले आहेत. पारगाव जप्तीपासून सुरू झालेला आवाज आता सर्वदूर संत तुकाराम बाबा महाराज यांच्या पुण्यभूमी पारगाव जप्ती येथे या आंदोलनाच्या तयारीची पहिली बैठक घेण्यात आली. पन्नास वर्षांपासून शेतकरी चळवळींचा इतिहास असलेल्या या भूमीतून शेतकऱ्यांचे आवाज उठताच त्याला जिल्ह्यात सर्वत्र प्रतिसाद मिळू लागला. या बैठकीनंतर काही दिवसांतच नांदुर, पाली, अंथरवन, प्रिंप्रि, नाळवंडी, चौसाळा या गावांमध्ये शेकडो शेतकरी सहभागी असलेल्या शक्तीप्रदर्शनाच्या बैठकांचा सिलसिला सुरू झाला. प्रत्येक बैठकीत भाववाढ, हमीभाव, हमीखरेदी, तात्काळ आर्थिक मदत, ▶▶ उर्वरित पान २ वर

● बीडमध्ये निर्णायक बैठक ●

दि. ११ डिसेंबर, गुरुवार, सकाळी ११ वाजता, हॉटेल बालाजी सम्राट चौक, पांगरी रोड, बीड. या बैठकीत जिल्हाभरातील शेतकरी, युवा शेतकरी, शेतकरी पुत्र, ज्येष्ठ शेतकरी यांचा प्रचंड जमाव अपेक्षित असून या बैठकीत आंदोलनाचा अंतिम कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे.